**राज्यात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम (PC&PNDT Act), १९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम (MTP Act) १९७१ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कृती दल (State Task Force) स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांकः प्रचिनि -३१२६/प्र.क्र. ७७ /कु.क.२(ई-१८२१४८१)
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला, बी- विंग,
मंत्रालय, एल.टी.मार्ग, मुंबई -४०० ००१.
दिनांक :- ०८ सप्टेंबर, २०२६

**वाचा -**

१) अतिरिक्त संचालक,राज्य कुटुंक कल्याण कार्यालय,पुणे यांचे पत्र क्र राकुकका / पीसीपीएनडीटी / कक्ष ८ड /राज्यस्तरीय कृती दल( State Task Force) स्थापन करणेबाबत /४१८७३-७७ /२०२६,दि.२०.०८.२०२६.

**प्रस्तावना :-**

राज्यात गर्भलिंग निदानास प्रतिबंध करुन स्त्रीभ्रुण हत्या थांबविणे, बेकायदेशीर गर्भपातास आळा घालणे तसेच राज्याच्या जन्मतः लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये सुधारणा करणे आणि गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम (PCPNDT Act), १९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम (MTP Act) १९७१ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. राज्यामध्ये नजीकच्या कालावधीमध्ये ब-याच ठिकाणी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम (MTP Act) १९७१ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली असून यासाठी सोनोग्राफी व तत्सम केंद्रे आणि एम.टी.पी. केंद्रांवर प्रभावी देखरेख व तपासणी विविध विभागाच्या

समन्वयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने राज्यस्तरीय कृती दल (State Task Force) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती..

**शासन निर्णय :-**

गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम (MTP Act) १९७१ ची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करुन स्त्रीभ्रुण हत्या थांबविणे, बेकायदेशीर गर्भपातास आळा घालणे तसेच राज्याच्या जन्मत: लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये सुधारणा करणे याकरीता पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय कृती दल (State Task Force) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| **अ.क्र** | **सदस्याचे नाव /पदनाम** | **सदस्यत्वाचा प्रकार** |
|---|---|---|
| १. | मा.डॉ.(श्रीम) निलम गोऱ्हे, विधानपरिषद सदस्य | अध्यक्ष |
| २. | मा.डॉ.(श्रीम.) प्रज्ञा सातव , विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती भावना गवळी, विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ४. | मा.श्रीमती चित्रा वाघ,विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ५. | मा.श्रीमती उमा खापरे, विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ६. | मा.डॉ.मनिषा कायंदे ,विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ७. | मा.श्रीमती स्नेहा -दुबे पंडित . विधानसभा सदस्य (वसई) | सदस्य |
| ८. | मा.श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य (चिखली) | सदस्य |
| ९. | अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय,पुणे | सदस्य सचिव |

३. समितीची कार्यकक्षा.

1) राज्यातील जिल्हा व महानगरपालिकांना प्रत्यक्ष भेटी देऊन गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ सुधारित २००३ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने समुचित प्राधिका-यांचा (जिल्हा- जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय/महानगरपालिका- वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका) आढावा घेणे व प्रभावी अंमलबजावणीसाठी सुधारणात्मक उपाययोजना शासनास सुचविणे.

२) संबंधीत जिल्हा /महानगरपालिका समुचित प्राधिकारी (जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय / वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ) यांच्यासह सोनोग्राफी व तत्सम केंद्रे आणि वैद्यकिय गर्भपात केंद्रांना अचानक भेटी देवून कायद्यातील तरतुदींचा भंग होत नसल्याबाबत खात्री करण्यासाठी तपासणी करणे.

३) सदर तपासणीदरम्यान केंद्रात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असल्यास संबंधीत जिल्हा/महानगरपालिका समुचित प्राधिका-यास अधिनियमातील तरतुदीनुसार तात्काळ योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देणे.

४) जिल्हा/महानगरपालिकानिहाय गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम,१९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१ च्या अंमलबजावणीतील त्रुटी व अडचणीवर मात करण्यासाठी शासनास शिफारशी करणे.

५) स्त्रीभ्रुण हत्या प्रतिबंध व मुलींच्या जन्माचे महत्त्व याबाबत समाजात सकारात्मक वातावरण निर्मिती व जनजागृतीसाठी शासनास योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

६) गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम,१९९४ सुधारित २००३ व वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१ च्या कार्यक्षेत्रातील प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा/महानगरपालिकास्तरीय अधिकाऱ्यांची समन्वय बैठक आयोजित करुन संबंधितास आवश्यक त्या सूचना देणे.

**क) जिल्हा प्रशासनाची जबाबदारी:-**

राज्यस्तरीय विशेष कृती दलाच्या जिल्हा /महानगरपालिका भेटीदरम्यान संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा /महानगरपालिका समुचित प्राधिकारी यांनी राज्यस्तरीय विशेष कृती दलास आवश्यक ते सर्व प्रशासकीय, तांत्रिक व अभिलेखीय सहकार्य करावे.

**ड) राज्यस्तरीय कृती दलाच्या जिल्हा/महानगरपालिका भेटीसाठी आवश्यक अनुषंगीक खर्च:-**

राज्यस्तरीय विशेष कृती दलाच्या जिल्हा/महानगरपालिका भेटीसाठी आवश्यक वाहन व्यवस्था, स्थानिक प्रवास, इंधन, निवास, जेवण व बैठक व्यवस्था तसेच इतर अनुषंगिक खर्च संबंधित जिल्हा/महानगरपालिका समुचित प्राधिका-यांनी त्यांच्या स्तरावर सोनोग्राफी व तत्सम केंद्रांच्या नोंदणी/नुतनीकरण शुल्कापोटी ५० टक्के दराने जमा झालेल्या निधीतून सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:-प्रचिनी-३१२५/(ई.क्र.-९६४८९५)/प्र.क्र.१५/कु.क., दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ मधील तरतुदीनुसार व शासनाच्या वित्तीय नियमांचे पालन करुन भागवावा.

**इ) अहवाल सादरीकरण:-**

राज्यस्तरीय कृती दलाने आपल्या भेटीचा निरीक्षण तसेच शिफारसीचा अहवाल दर तीन महिन्यांनी शासनास (सार्वजनिक आरोग्य विभागास) सादर करावा. सदर अहवालातील निरीक्षण व शिफारशींनुसार प्रशासकीय विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**ई) राज्यस्तरीय कृती दलाचा कार्यकाळ:-**

राज्यस्तरीय कृती दलाचा कार्यकाळ तीन वर्षाचा असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०९०८१२२८२४५७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VASANT PANDURANG GAIKWAD

Digitally signed by VASANT PANDURANG GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=6762a1c7f462bd961625d44d6971dc2c9f06f3437a7f750c414e77ec2b7f466d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7C71DE18A037CE1808BB4E1BA5462D93EB69C5FEB96700EDA8ADF1B3C9C753F8, cn=VASANT PANDURANG GAIKWAD
Date: 2026.09.08 13:10:32 +05'30'

**(वसंत पां.गायकवाड)**
**अवर सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,राजभव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण ) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मा. उपमुख्यमंत्री ( रा.ऊ.श ,क्रिडा व युवक कल्याण व अल्पसंख्यांक व औकाफ ) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई .
६. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा /विधानपरिषद) यांचे स्वीय सहाय्यक .
७. मा.विधानसभा /विधानपरिषद सदस्य,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
८. मा. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,मंत्रालय,मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक ,मंत्रालय,मुंबई
११.जिल्हाधिकारी (सर्व)

१२.आयुक्त ,आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

१३.आयुक्त, शहरी आयोग, आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

१४. सर्व सह /उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई

१५.संचालक (रुग्णालय/प्राथमिक),आरोग्य सेवा,मुंबई/पुणे

१६.उपसंचालक,आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)

१७.जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व )

१८.जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व जिल्हा परिषद)

१९.निवड नस्ती (कुटुंब कल्याण -२)